Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ
स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

गोपनीय/महत्वाचे/तातडीचे

क्रमांक रा.मं./परीक्षा–६/3326
पुणे.४११ ००४.
दिनांक– २७.०७.२०२३

प्रति,

विभागीय अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्य. व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय–माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) जुलै–ऑगस्ट २०२३ परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत.**
**संदर्भ– क. रा.मं./परीक्षा–६/२३८८, दि. ०६.०६.२०२३ रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रांस अनुसरून कळविण्यात येते की, जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. १८/०७/२०२३ ते दि. १०/०८/२०२३ आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा दि. १८/०७/२०२३ ते दि. ०१/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे.

तथापि राज्यातील काही जिल्हयांमध्ये दि. २८/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे, व शासनाने त्यानुसार शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

सबब माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या दि. २८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी)**

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला दिनांक<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ | वेळापत्रकाबाबत सुधारीत तपशील<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ |
|---|---|
| सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>शुक्रवार, दि.२८ जुलै २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.०० | सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>गुरूवार दि. ०३ ऑगस्ट २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.००<br>या वेळेत घेण्यात येतील |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) च्या लेखी परीक्षा व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकात इतर कोणताही बदल नाही. सदर बाब विचारात घेवून गोपनीय साहित्याबाबत विभागीय मंडळ स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

१ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) च्या लेखी परीक्षेसाठी या पूर्वी गोपनीय मुद्रणालयाकडून पुरविण्यात आलेल्या दि. २८ जुलै, २०२३ रोजीच्या प्रश्नपत्रिका आहे त्या स्थितीत (पाकीटामध्ये) त्वरीत स्वतंत्र खोलीमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत सर्व परिरक्षकांना लेखी सूचना आजच द्याव्यात सदरची कार्यवाही परिरक्षकांच्या निरीक्षणाखाली राबविण्यात यावी.

२ सदर प्रक्रिया करताना संबंधीत पेटयांवरील तारखा व विषय याबाबतचा तपशील याची पूर्णतः खात्री करावी.

३ कोणत्याही परिस्थितीत दि. २८ जुलै, २०२३ साठी पुरविण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा प्रश्नपत्रिकांचे वितरण व वापर अनुक्रमे दि. ०३ ऑगस्ट, २०२३ पूर्वी होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्याबाबत परिरक्षकांना सूचना द्याव्यात.

४ दि. २८ जुलै, २०२३ साठी यापूर्वी पुरविण्यात आलेले बारकोड, युआयडी स्टीकर व इतर अनुषंगिक साहित्यच दि. ०३ ऑगस्ट २०२३ साठी वापरण्यात यावे.

५ सदर विषयांच्या संयुक्त सभा व नियामक सभा उपरोक्त बदल विचारात घेवून आयोजित करण्यात याव्यात.

६ उपरोक्त कार्यवाहीचे महत्व व तातडी लक्षात घेता सदर प्रक्रिया त्वरीत पूर्ण करण्याबाबत सर्व परिरक्षकांना कळवावे व त्याबाबतचा गोपनीय अहवाल राज्य मंडळास सादर करावा.

उपरोक्त बदलांच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व नियोजन स्वत: विभागीय अध्यक्ष व विभागीय सचिव यांनी वैयक्तीक लक्ष घालून करावे. तसेच कोणताही विद्यार्थी उपरोक्त बदलामुळे परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेवून परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची कार्यवाही करावी.

तसेच वेळापत्रकातील उपरोक्त बदल आपल्या कार्यकक्षेतील सर्व संबंधीत माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, विद्यार्थी, संबंधित केंद्रसंचालक, संबंधित परिरक्षक व अन्य घटकांच्या निदर्शनास आणून द्यावा. विभागीय मंडळ स्तरावर उपरोक्त बदलाची नोंद घेवून अनुषंगिक सर्व कार्यवाही अतिशय काटेकोरपणे अंमलात आणावी.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) पुरवणी परीक्षा लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची नोंद घेवून उचित कार्यवाही तातडीने करावी.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

त माहितीस्तव– विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे.

---

क्र.कोविम/डीपी/११६५
दिनांक २८/०७/२०२३

प्रति,

सर्व परिरक्षक/केंद्रसंचालक,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

उपरोक्त पत्रामध्ये निर्देशित केल्यानुसार, पृष्ठ क्र.१ ते २ मधील सूचनेनुसार परिरक्षकांनी व केंद्रसंचालक यांनी उचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. तसेच केंद्रसंचालकांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य व सर्व विद्यार्थ्यांना आपल्यामार्फत वेळापत्रक बदलाबाबत अवगत करण्यात यावे. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर